पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील नंदनवन पोलीस ठाण्याचे विभाजन करुन वाठोडा पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः पीओएस-२६१६/प्र.क्र.१३९/पोल-३

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : २१ एप्रिल, २०१८.

वाचा :-

१) गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीओपी-३१०१/प्र.क्र.१७/पोल-३, दि. १८.०९.२००६.
२) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे पत्र क्र.पोआना/जी-७/नवीन पो.स्टे.वाठोडा/प्रस्ताव/२०१५/१५६७, दि. ३०.०८.२०१६.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पो आ नागपूर शहर (वाठोडा)/९४/२०१६, दि.०६.१०.२०१६.
४) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे पत्र क्र.पोआना/जी-७/नवीन पो.स्टे.वाठोडा/निर्मिती प्रस्ताव/२०१७, दिनांक १५.०५.२०१७.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पो आ नागपूर शहर (वाठोडा)/९४/२०१५, दि.२९.०५.२०१७.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पो आ नागपूर शहर (वाठोडा)/९४/२०१५, दि.१३.१२.२०१७.
७) मा.उच्चस्तर सचिव समितीच्या दिनांक १८.१२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त.
८) सह सचिव तथा सदस्य सचिव, उच्चस्तर सचिव समिती, वित्त विभाग यांचे पत्र क्र.पदनि-२०१७/प्र.क्र.८३/१७/आ.पु.क., दि.१८.०१.२०१८.

प्रस्तावना :-

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथे नमूद दिनांक १८.०९.२००६ च्या शासन निर्णयान्वये नंदनवन पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर नंदनवन पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामधील वाठोडा परिसरामध्ये लोकसंख्येत मोठी वाढ झालेली आहे. सदर वाठोडा परिसरामध्ये मनुष्याविरुध्द व संपत्तीविषयक पारंपारिक गुन्हेही मोठया प्रमाणावर घडत असतात. सदर परिसरात सतत निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रसंगामुळे नविन पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. उक्त बाबींचा विचार करुन सदर परिसरामध्ये कायदा व सुव्यवस्था

राखणे व गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उक्त संदर्भाधिन क्र.३ येथे नमूद दिनांक ०६.१०.२०१६ च्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील नंदनवन पोलीस ठाण्याचे विभाजन करुन प्रस्तावित वाठोडा पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नंतर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उक्त संदर्भाधिन क्र.६ येथे नमूद दिनांक १३.१२.२०१७ च्या पत्रान्वये प्रस्तावित वाठोडा पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उच्चस्तर सचिव समितीने दिनांक १८.१२.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रस्तावित वाठोडा पोलीस ठाणे निर्माण करण्यास व तद्नुषंगाने पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची ६० पदे निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील नंदनवन पोलीस ठाण्याचे विभाजन करुन वाठोडा पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त नवनिर्मित वाठोडा पोलीस ठाण्याकरिता पोलीस दलातील खालील तक्त्यात नमूद विविध संवर्गातील ६० पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
१.	पोलीस निरीक्षक	रु.९३००-३४८००+ ग्रेड पे ५०००	०२
२.	पोलीस उपनिरीक्षक	रु. ९३००-३४८००+ ग्रेड पे ४३००	१२
३.	सहायक पोलीस उपनिरीक्षक	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २८००	०५
४.	पोलीस हवालदार	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २४००	१५
५.	पोलीस शिपाई	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २०००	२०
६.	चालक पोलीस शिपाई	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २०००	०६
		एकुण पदे -	**६०**

३. उपरोक्त तक्त्यात नमूद करण्यात आलेली पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची पदे त्यासाठी केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार भरण्यात यावीत.

४. उपरोक्त नवनिर्मित वाठोडा पोलीस ठाणे कार्यान्वित होईपर्यंत सदर पोलीस ठाण्यासाठी वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची ६० पदे नंदनवन पोलीस ठाण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात यावीत.

५. सदर नवनिर्मित वाठोडा पोलीस ठाणे निर्माण करण्यासाठी येणारा आवर्ती खर्च व अनावर्ती खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१३६/१८/व्यय-७, दिनांक १३.०४.२०१८ अन्वये वित्त विभागाने तसेच मा.उच्चस्तर सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२११६१८२९७३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhiraj K Abhang

Digitally signed by Dhiraj K Abhang
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b83edfcbaa0fddb5983e8303bccd9a96ef7cc55853b8b449ff8dc53d69f1618d, cn=Dhiraj K Abhang
Date: 2018.04.21 16:21:43 +05'30'

(धीरज कां. अभंग)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, नागपूर शहर.
१०. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, नागपूर.
१२. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१६. वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१७. निवड नस्ती, पोल-३.